# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
# (सचिवालय)

**प्रस्तावना :-** नागपूर महानगरपालिकेच्या मालमत्ता कर व कर आकारणी
**{मालमत्ता कर विभाग }** विभागाद्वारा वसूल करण्यात येणाऱ्या आय रक्कमेचे उचित ताळमेळ करण्याचे काम विनिर्विष्ट स्वरूपाचे (Specialized Job) असल्याने व महानगरपालिकेच्या आर्थिक बाबींवर आंतरिक नियंत्रण ठेवणे आवश्यक असल्याने सदर्हु काम गोपनियता बाळगुन व विश्वासाने होणे गरजेचे आहे सदर काम मे. ए. एस. कुलकर्णी ॲण्ड असोसिएट्स फर्म हे काम सातत्यपूर्णरित्या व यशस्वीरित्या पार पाडत आहे. मालमत्ता कर विभागांतर्गत मालमत्ता कराची दैनंदिन वसूली झोन कार्यालयातील कर संग्राहक द्वारा वसुल केलेली दैनंदिन वसुली रक्कम मुख्य बँक खात्यात महानगरपालिका निधीमध्ये जमा झाली किंवा नाही, याबाबत वसुल करण्यात आलेल्या मालमत्ता कराची DCR प्रमाणे रक्कम, Collecting Bank द्वारा Pickup करण्यात आलेली रक्कम, व म.न.पा. च्या मुख्य बँक खात्यात / महानगरपालिका निधीमध्ये जमा झालेली रक्कम, याबाबत ताळमेळ बसतो किंवा नाही याची पडताळणी वेळीच करत असल्याने महानगरपालिकेच्या निधीचे नुकसान होत नाही. सदर फर्मने महानगरपालिकेद्वारे जमा करण्यात आलेला निधी व प्रत्येक्षात बँकेत जमा झालेला निधी यात ज्यावेळेला तफावत आढळली त्यावेळेला त्याचा Flash Report सादर केलेला असुन सदर फर्मने बँकेकडुन त्वरीत तफावत रक्कमेची वसुली करून महानगरपालिकेचे नुकसान होऊ दिले नाही.

A.S. Kulkarni & Associates यांचे कामाचे स्वरूप व Specialized काम योग्य रित्या हाताळत असल्याचे त्यांना माहे सप्टेंबर – 2025 ते ऑगस्ट – 2026 पर्यंत प्रती माह रू. 195000/- प्रमाणे एकुण रू. 23,40,000/- खर्चास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न विचारात घेणे.

## पारीत ठराव

**ठराव क्रमांक** :- 254/**स्थायी समिती/प्रशासक** **दिनांक** :- 04/09/2025

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार उपायुक्त (महसुल), मालमत्ता कर विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार नागपूर महानगरपालिकेच्या मालमत्ता कर व कर आकारणी विभागाद्वारा वसूल करण्यात येणाऱ्या आय रक्कमेचे उचित ताळमेळ करण्याचे काम विनिर्विष्ट स्वरूपाचे (Specialized Job) असल्याने व महानगरपालिकेच्या आर्थिक बाबींवर आंतरिक नियंत्रण ठेवणे आवश्यक असल्याने सदर्हु काम गोपनियता बाळगुन व विश्वासाने होणे गरजेचे आहे सदर काम मे. ए. एस. कुलकर्णी ॲण्ड असोसिएट्स फर्म हे काम सातत्यपूर्णरित्या व यशस्वीरित्या पार पाडत आहे. मालमत्ता कर विभागांतर्गत मालमत्ता कराची दैनंदिन वसूली झोन कार्यालयातील कर संग्राहक द्वारा वसुल केलेली दैनंदिन वसुली रक्कम मुख्य बँक खात्यात महानगरपालिका निधीमध्ये

जमा झाली किंवा नाही, याबाबत वसुल करण्यात आलेल्या मालमत्ता कराची DCR प्रमाणे रक्कम, Collecting Bank द्वारा Pickup करण्यात आलेली रक्कम, व म.न.पा. च्या मुख्य बँक खात्यात / महानगरपालिका निधीमध्ये जमा झालेली रक्कम, याबाबत ताळमेळ बसतो किंवा नाही याची पडताळणी वेळीच करत असल्याने महानगरपालिकेच्या निधीचे नुकसान होत नाही. सदर फर्मने महानगरपालिकेद्वारे जमा करण्यात आलेला निधी व प्रत्येक्षात बँकेत जमा झालेला निधी यात ज्यावेळेला तफावत आढळली त्यावेळेला त्याचा Flash Report सादर केलेला असुन सदर फर्मने बँकेकडुन त्वरीत तफावत रक्कमेची वसुली करून महानगरपालिकेचे नुकसान होऊ दिले नाही.

A.S. Kulkarni & Associates यांचे कामाचे स्वरूप व Specialized काम योग्य रित्या हाताळत असल्याचे त्यांना माहे सप्टेंबर – 2025 ते ऑगस्ट – 2026 पर्यंत प्रती माह रू. 195000/- प्रमाणे एकुण रू. 23,40,000/- खर्चाच्या प्रस्तावास मा. प्रशासक यांनी मंजुरी प्रदान केली.